दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद
आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा
संपादक : ज्योती मधुकर आडेकर ▌कार्यकारी संपादक : विद्या जाधव ▌उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

PUNE : Volume No. 1, Issue No. 282, Marathi Daily Tuesday, Date - 19 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4
पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २८२ वा | मराठी दैनिक | मंगळवार दि. १९ मे २०२८ | किंमत २ रुपये | पाने ४

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३
संपर्क - 9168567111
वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# वराडीच्या ट्रकवर कंटेनर कोसळून १२ ठार



**मुंबई । प्रतिनिधी**

लग्नाचा आनंद साजरा करण्यासाठी निघालेल्या वराड्यांवर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना पालघर जिल्ह्यात घडली आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील धानीवरी परिसरात रविवारी मध्यरात्री ट्रक आणि कंटेनरमध्ये झालेल्या भीषण अपघातात १२ जणांचा जागीच मृत्यू झाला असून २० ते २५ जण गंभीर जखमी झाले आहेत.

जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, डहाणू तालुक्यातील बापूगाव येथून एका कुटुंबातील विवाह सोहळ्यासाठी वराडी घेऊन आयशर ट्रक धानीवरी गावाकडे निघाला होता. या ट्रकमध्ये महिला, पुरुष, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसह १०० हून अधिक लोक प्रवास करत होते. लग्नघरात आनंदाचे वातावरण असताना काही क्षणांतच भीषण दुर्घटनेने सर्वांवर दुःखाचा डोंगर कोसळला. वरील ट्रक धानीवरी गावाजवळील खडकीपाडा परिसरात पोहोचला असताना मुंबईच्या दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या कंटेनरने ट्रकला समोरून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कंटेनरचा पुढील भाग पूर्णपणे तुटून थेट ट्रकच्या वर जाऊन पडला. त्यामुळे ट्रकमध्ये बसलेले अनेक वराडी कंटेनरखाली दबले गेले.

अपघातानंतर घटनास्थळी एकच आरडाओरड आणि गोंधळ उडाला. जखमी मदतीसाठी ओरडत होते. अनेकजण रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. काही प्रवासी ट्रकच्या लोखंडी भागात अडकले होते. स्थानिक ग्रामस्थांनी जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू केले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. त्यांनी पोलिस आणि प्रशासन पोहोचण्यापूर्वीच जखमींना बाहेर काढण्यास सुरुवात केली. काहींना हाताने, तर काहींना लोखंडी रॉड आणि कटरच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले. घटनास्थळी हृदय पिळवटून टाकणारे दृश्य पाहायला मिळत होते.

यानंतर कासा पोलीस, महामार्ग पोलीस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. बचाव पथकाने क्रेनच्या सहाय्याने कंटेनर बाजूला करून अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. अपघातातील सर्व जखमींना तातडीने कासा उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र काहींची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी धुंदलवाडी येथील वेदांत रुग्णालय तसेच गुजरातमधील रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले आहे. डॉक्टरांकडून जखमींवर युद्धपातळीवर उपचार सुरू आहेत. रुग्णालय परिसरात नातेवाईकांची मोठी गर्दी झाली होती. आपल्या कुटुंबीयांचा शोध घेण्यासाठी अनेकजण धावपळ करताना दिसत होते. काही नातेवाईकांना मृत्यूची बातमी समजताच रुग्णालयातच आक्रोश सुरू झाला. या भीषण अपघातामुळे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे विस्कळीत झाली होती. अपघातग्रस्त ट्रक आणि कंटेनर रस्त्यावर आडवे झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने दोन्ही वाहने बाजूला हटवून वाहतूक सुरळीत केली. प्राथमिक अंदाजानुसार कंटेनर चालकाचा वेगावरील ताबा सुटल्याने हा अपघात घडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. चालकाची चौकशी केली जात असून सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या माहितीदेखील तपासली जात आहे.

## थोडक्यात...

### अल्पवयीन मुलींचे दहावीपर्यंत प्रवेश शुल्क शासनामार्फत भरण्यास विशेष मान्यता




**मुंबई । प्रतिनिधी**

बदलापूर येथे ऑगस्ट २०२४ मध्ये एका शाळेत अनुचित घटना घडली होती. त्या घटनेनंतर त्यातील दोन अल्पवयीन मुलींच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी त्यांच्या इयत्ता दहावीपर्यंतच्या शिक्षणाचा प्रवेश शुल्काचा संपूर्ण खर्च शासनामार्फत अदा करण्यास, एक वेळची विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

शासन निर्णय वाचा : https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/Marathi/202605141544164721.pdf

तत्कालीन शालेय शिक्षणमंत्र्यांनी पीडित मुलींच्या शिक्षणाचा खर्च शासन उचलण्याची घोषणा केली होती. त्यानुसार मुलींच्या पालकांच्या इच्छेनुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात संबंधित शाळांमध्ये दोन्ही मुलींचा ज्युनिअर के. जी. मध्ये प्रवेश करण्यात आला होता.

शासन निर्णयानुसार, निर्भया क्र. १ हिचे इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे तसेच निर्भया क्र. २ हिचे प्रलंबित सिनिअर के. जी. व इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शैक्षणिक वर्षांचे प्रवेश शुल्क 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' अंतर्गत शासनामार्फत अदा करण्यात येणार आहे. ही मान्यता एक वेळची विशेष बाब म्हणून देण्यात आली आहे.

दोन्ही मुली ज्या शाळांमध्ये प्रवेशित आहेत, त्या शाळांना त्यांनी विहित केलेल्या रकमेइतके प्रवेश शुल्क संबंधित शैक्षणिक वर्षात अदा करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक कार्यवाही संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्यामार्फत करण्यात येईल.

### औषध विक्रेत्यांच्या संपाबाबत नागरिकांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या वतीने दि. २० मे, २०२६ रोजी देशव्यापी संप पुकारण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला दिली आहे. या संपामध्ये संघटनेचे सभासदांनी सहभागी होवू नये याबाबत त्यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे. तथापि, नियमित औषधांची आवश्यकता असलेल्या रुग्णांनी व त्यांच्या नातेवाईकांनी संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक औषधांचा आगाऊ साठा करून ठेवावा. संपाच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास किंवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (औषधे) श्री. जी. डी. जाधव (८३७९० १६०६८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जी.डी. जाधव सहायक आयुक्त (औषधे) अन्न व औषधा प्रशासन यांनी केले आहे.

**प्रतिनिधी पाहिजेत**




जालना आणि पुणे येथून,प्रकाशित होणारे दैनिक महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा,तालुका आणि सर्कलसाठी प्रतिनिधी पाहिजेत. सामाजिक,शैक्षणिक,धार्मिक,राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर संपर्क सांधावा.

दैनिक महिला संवाद कार्यालय

- मुख्यकार्यालय पत्ता -
गांधी चमन,सावित्रीबाई फुले चौक, जालना 9168567111

- विभागीय कार्यालय पत्ता -
सी-२०३,अनंत पार्क,काळेवाडी रोड,राहटनी, धनगर बाबा मंदिरजवळ, पुणे शहर,पुणे-४११०१७(महाराष्ट्र)

mahilasanvad11@gmail.com https://epaper.mahilasanvad.com

# बेल्हे गुजाळवाडीत एसटीचा भीषण अपघात

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातून मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे एसटी बसचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये चालकासह एका प्रवाशाचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर येत आहे. तसेच अन्य २५ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली, स्थानिकांच्या मदतीने या अपघातामध्ये जखमी झालेल्या प्रवाशांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. समोर चाललेल्या चारचाकी गाडीला ओव्हरटेक करताना चालकाचं नियंत्रण सुटलं आणि ही बस खड्यात पलटी झाल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की ही घटना पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर तालुक्यातील बेल्हे गुजाळवाडी परिसरात घडली आहे. कल्याण -अहिल्यानगर महामार्गावर हा भीषण एसटी अपघात घडला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार समोर असलेल्या चारचाकी वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या नादात चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात झाला आहे. एसटी बस खड्ड्यात पलटी झाली. या अपघातामध्ये चालकासह एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.





दरम्यान या अपघातामध्ये २५ प्रवाशी जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. अपघात होताच घटनास्थळी स्थानिकांनी मोठी गर्दी केली. स्थानिकांच्या मदतीने तातडीने जखमींना आळेफाटा परिसरातील एका रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या घटनेत बसचा वाहक देखील जखमी झाला आहे.

समोर असलेल्या चारचाकी वाहनाला ओव्हर टेक करण्याच्या नादात हा अपघात झाला. चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटलं आणि एसटी बस थेट खड्ड्यात पलटी झाली. हा अपघात एवढा भीषण होता की, चालक आणि एका प्रवाशाचा मृत्यू झाला आहे. तसचे २५ जण जखमी झाले, दरम्यान अपघात घडल्याचं लक्षात येताच स्थानिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केल्यानं काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यानंतर ती पुन्हा एकदा सुरळीत सुरू झाली. दरम्यान या अपघातामध्ये बसचं देखील मोठं नुकसान झालं आहे.

# पुणे पुन्हा हादरले! ९ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

विद्येचं माहेरघर मानल्या जाणाऱ्या पुणे या शहराला आता गुन्हेगारीचं माहेरघर म्हणावे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या काही दिवसांमध्ये येथे बलात्काराच्या धक्कादायक घटना घडलेल्या आहेत. विशेष म्हणजे यातील काही घटना या चिमुकल्या मुलींवर अत्याचार केल्याच्या आहेत. नुकतेच पुण्यातील भोर तालुक्यात एका ६० वर्षीय व्यक्तीने एका चिमुकीवर बलात्कार करून तिची हत्या केली. त्यानंतर पुण्यातील पर्वती येथे एका ९ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न झाला. आजूबाजूच्या लोकांच्या लक्षात आले म्हणून ती चिमुकली सुदैवाने वाचली. या सर्व घटना ताज्या असतानाच आता पुण्यात आणखी एक बलात्काराचा गंभीर प्रकार घडला आहे. पुण्यातील येवलेवाडी परिसरात एका ९ वर्षीय लहानगीवर बलात्कार करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार पुण्यातील येवलेवाडी परिसरात एका नऊ वर्षीय अल्पवयीन मुलीवरती अत्याचार करण्यात आला आहे. अत्याचार करणाऱ्या आरोपीचे नाव धनराज बालाटी असे आहे. हा नराधम ३८ वर्षांचा आहे. त्याने ज्या मुलीवर अत्याचार केला आहे, ती अवघी ९ वर्षांची आहे. विशेष म्हणजे हा आरोपी पीडित मुलीचा नात्याने चुलत आजोबा लागतो.

घरात कोणीही नसल्याची संधी साधत या धनराज बालाटी नावाच्या नराधमाने आपल्या ९ वर्षीय नातीवर हात टाकला आहे. पीडित मुलीचे कुटुंब हे उदरनिर्वाहासाठी नेपाळवरून पुण्यात आलेले आहे. पीडित मुलीचे आई-वडील हे बाहेर गेले होते. आरोपी पीडित मुलीच्या घराशेजारीच राहायचा. त्याने मुलीच्या घरी तसेच आजूबाजूला कोणीही नसल्याचा फायदा घेत तिच्यावर अत्याचार केला आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू केला आहे. लवकरच या प्रकरणातील आणखी माहिती समोर येण्याची शक्यता आहे. परंतु पुण्यासारख्या भागात अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. या आरोपीवर लवकरात लवकर खटला चालवावा. तो गुन्हेगार असल्याच त्याला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी केली जात आहे.

# धावत्या कारमध्ये महिलेवर अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात चालत्या कारमध्ये महिलेवर अत्याचार झाल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. पुण्यातील मुंढवा कोरेगाव पार्क रस्त्यावरती ही घटना घडली आहे. मध्यरात्री एका हॉटेलमध्ये पार्टीसाठी आलेल्या महिलेला घरी सोडण्याच्या बहाण्याने कारमध्ये लैंगिक अत्याचार करण्यात आला.



या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रात्री पार्टीत ओळख झालेल्या पुरुषाने घरी सोडतो म्हणून कारमध्ये नेलं आणि अत्याचार केला. पुण्यातल्या प्रसिद्ध कोरेगाव पार्क परिसरातील एका हॉटेल मधून महिला आणि पुरुष बाहेर पडले होते. या महिलेची आणि पुरुषाची ओळख पार्टीमध्ये झाली होती, त्यानंतर घरी सोडण्याच्या बाहण्याने पुरुषांनी महिलेवर अत्याचार केला आहे. कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनमध्ये या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रात्री पार्टीत ओळख झालेल्या पुरुषाने घरी सोडतो म्हणून नेलं आणि तिच्यावरती अत्याचार केला. धावत्या कारमध्ये त्या व्यक्तीने महिलेवर अत्याचार केल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यातल्या कोरेगाव पार्क परिसरातील एका हॉटेल मधून महिला आणि पुरुष सोबतच बाहेर पडले होते. या महिलेची आणि पुरुषाची ओळख पार्टीमध्ये झाली होती, असे समोर आले आहे. पुरूषाने त्यानंतर घरी सोडण्याच्या बाहण्याने अत्याचार केल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास केला जात आहे. या घटनेनं पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# मुलगा होत नाही म्हणून पत्नीवर अमानुष अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील उरुळी परिसरामध्ये पतीकडून क्रौर्याचा कळस गाठल्याची संतापजनक घटनेची माहिती समोर आली आहे. पत्नीच्या गुप्तांगावर सिड टाकून १५ दिवस घरात कोंडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चारित्र्यावर संशय घेत 'फक्त मुलीच होतात, मुलगा होत नाही' या विकृत मानसिकतेतून एका पतीने २४ वर्षीय पत्नीला अमानुष मारहाण करून तिच्या गुप्तांगावर सिड ओतल्याची धक्कादायक घटना उरुळी कांचन (ता. हवेली) येथे उघडकीस आली. क्रौर्याचा कळस म्हणजे या कृत्यानंतर आरोपीने पीडितेला रुग्णालयात न नेता तब्बल १५ दिवस घरातच डांबून ठेवले होते. याप्रकरणी पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून उरुळी कांचन पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही धक्कादायक घटना २० एप्रिल रोजी घडली आहे. पीडितेचा पती दारू पिऊन घरी आला आणि 'तू कामावर जातेस, तुझे बाहेर कोणाशी अनैतिक संबंध आहेत ते सांग,' असे म्हणत त्याने शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर धमकी देत त्याने सिडची बाटली आणून तिच्या गुप्तांगावर ओतले. असह्य वेदनेने महिला जिवाच्या आकांताने ओरडत होती. तिने घराबाहेर पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, नराधमाने घराचा दरवाजा आतून बंद करून तिला पुन्हा लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. पीडितेचा आरडाओरडा ऐकून शेजारी राहणाऱ्या तिच्या जावेने सासू-सासऱ्यांना फोन करून बोलावले. मात्र, तोपर्यंत आरोपीने याबद्दल कोणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देत घरातून पळ काढला.



अखेर, शनिवारी (ता. ९) पती कामावर गेल्याची संधी साधून, पीडितेने आपल्या दोन्ही मुलींना सोबत घेतले आणि थेट माहेर गाठले. तिथे तिने घडलेला सर्व प्रकार नातेवाईकांना सांगितला. या घटनेने हादरलेल्या नातेवाईकांनी तिला उरुळी कांचन पोलिस ठाण्यात आणले. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून पीडितेला तत्काळ उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल केले. उपचार घेतल्यानंतर पीडितेने शुक्रवारी (ता. १५) तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा दाखल केला, अशी माहिती पोलिस निरीक्षक सचिन वांगडे यांनी दिली.

या अमानुष प्रकारामुळे उरुळी कांचन परिसरात संतापाची लाट उसळली असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. केवळ मुलगा होत नसल्याच्या कारणावरून आणि चारित्र्यावर संशय घेत पतीने पत्नीवर केलेल्या अत्याचाराने मानवतेलाच काळीमा फासला आहे. जखमी अवस्थेत तब्बल १५ दिवस महिलेला घरात डांबून ठेवण्यात आल्याने आरोपीच्या क्रौर्याची परिसीमा समोर आली आहे. पीडित महिलेने मोठ्या धैर्याने घरातून बाहेर पडत पोलिसांत धाव घेतल्याने हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असून, या घटनेनंतर महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराच्या वाढत्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय...

### महामार्ग बनले मृत्यूचे सापळे

पालघर जिल्ह्यातील धानीवरी येथे घडलेला भीषण अपघात संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणारा आहे. लग्नाचा आनंद साजरा करण्यासाठी निघालेल्या निष्पाप वराड्यांवर काळाने असा घाला घालावा, ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. एका क्षणात आनंदाचे वातावरण शोकात बदलले आणि अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. या दुर्घटनेत १२ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने चिंता अधिक वाढली आहे. ही घटना केवळ अपघात म्हणून पाहून चालणार नाही. महाराष्ट्रात आणि देशभरात रस्ते अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः राष्ट्रीय महामार्गांवर होणारे भीषण अपघात ही गंभीर चिंतेची बाब बनली आहे. वेगमर्यादांचे उल्लंघन, चालकांचा निष्काळजीपणा, थकवा, वाहनांची अयोग्य स्थिती आणि नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे अनेक निष्पाप लोकांना जीव गमवावा लागत आहे. या दुर्घटनेत सर्वात धक्कादायक बाब म्हणजे एका ट्रकमध्ये १०० हून अधिक वराडी प्रवास करत होते. ग्रामीण भागात लग्न समारंभासाठी ट्रक, ट्रॅक्टर किंवा मालवाहू वाहनांमधून मोठ्या प्रमाणात प्रवास करण्याची पद्धत अजूनही सुरू आहे. मात्र अशा वाहनांमध्ये सुरक्षिततेची कोणतीही हमी नसते. प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा, आपत्कालीन व्यवस्था किंवा सुरक्षा साधने उपलब्ध नसतात. त्यामुळे अपघात झाल्यास जीवितहानी मोठ्या प्रमाणात होते. प्रशासन आणि वाहतूक विभागाने अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची वेळ आता आली आहे. मालवाहू वाहनांमध्ये प्रवासी वाहतूक होत असेल तर त्यावर तातडीने नियंत्रण आणले पाहिजे. तसेच राष्ट्रीय महामार्गांवर वेग नियंत्रण, सीसीटीव्ही देखरेख, वाहतूक पोलिसांची गस्त आणि चालकांची तपासणी अधिक प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. या दुर्घटनेत स्थानिक नागरिकांनी दाखवलेली माणुसकीही तितकीच महत्त्वाची आहे. जीवाची पर्वा न करता ग्रामस्थांनी मदतकार्य केले, जखमींना बाहेर काढले आणि रुग्णालयात पोहोचवण्यासाठी धडपड केली. संकटाच्या काळात समाज अजूनही संवेदनशील आहे, हे या घटनेतून दिसून आले. मात्र प्रश्न असा आहे की, प्रत्येक वेळी निष्पाप लोकांचे बळी गेल्यानंतरच आपण जागे होणार का? अपघातानंतर चौकशी, मदतीच्या घोषणा आणि काही दिवस चर्चा होते; पण नंतर सर्व काही पुन्हा पूर्ववत होते. रस्ते सुरक्षा ही केवळ सरकारी जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाने वाहतूक नियमांचे पालन करणेही तितकेच आवश्यक आहे. धानीवरी येथील दुर्घटना हा केवळ एक अपघात नाही, तर संपूर्ण यंत्रणेसाठी धोक्याचा इशारा आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना आणि कठोर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. अन्यथा आनंदाचे प्रवास असेच मृत्यूच्या सावलीत हरवत राहतील.

# पुण्याला देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहराला देशाचे 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर' म्हणून ओळख मिळत असून ती पुढे नेण्यासाठी मेट्रोचे जाळे, रस्त्यांची सुधारणा, भूमिगत बोगद्यांचे जाळे तयार करणे आदी माध्यमातून उत्तम वाहतुकीची व्यवस्था, चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्तम जीवनशैली सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुणे शहरात हाती घेतलेले प्रकल्प पुढील ३ ते ४ वर्षात पूर्ण झाल्यानंतर देशातील एक आधुनिकतम शहर म्हणून ओळखले जावे यासाठी प्रयत्न सुरू आहे, असेही ते म्हणाले.

मोहम्मदवाडी येथील समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याच्या साठवण टाक्यांचे लोकार्पण तसेच मुंढवा येथील महात्मा फुले चौक ते खराडी मेट्रो समवेत दुमजली उड्डाणपुलाचे ऑनलाईन भूमिपूजनासह विविध प्रकल्पांचे लोकार्पण, भूमिपूजननिमित्त रहेजा चौक, दोराबजी मॉल जवळ, मोहम्मद वाडी हडपसर येथे आयोजित जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार योगेश टिळेकर, चेतन तुपे, भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते.

पुण्याचा नवीन विमानतळ, नवीन रिंग रोड, हडपसर पासून यवतपर्यंत आधुनिक प्रकारचा उन्नत मार्ग आदी सर्व माध्यमातून पुण्याची जोडणी चांगली करण्याचा प्रयत्न आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, गतवर्षी एकट्या पुण्यात देशातील २५ टक्के जीसीसी तयार झाले आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रानंतर पुढील लाट जीसीसीची असून त्यात पुणे पुढे चालले आहे. ते पुढे नेण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे. पुण्याला एक आधुनिक शहर म्हणून पुढे नेण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. महात्मा फुले चौक ते खराडी हा मेट्रोसह दुमजली पूल उभारण्यात येत असून त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यासह प्रवासातील १५ ते २० वाचणार आहेत. पुण्याला गतिमान करण्याच्या प्रयत्नातील हा एक महत्वाचा पूल आहे. कोंढवा परिसरातील रखडलेल्या कात्रज कोंढवा रस्त्याचे येत्या ६ महिन्यात भूसंपादन होऊन हा रस्ता पूर्ण होईल, असेही ते म्हणाले.

देशातील पहिले पीपीपी तत्वावर दर्जेदार आरोग्य सेवा उभी करता येते हे या कर्करोग उपचार रुग्णालयाच्या उभारणीवरून दिसून येते. राज्यात मोठ्या प्रमाणात कॅन्सर ग्रीड तयार करण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न सुरू आहे. या ग्रीडच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला कॅन्सरवरील आधुनिक उपचार वेळेत आणि अत्यल्प दरात वा मोफत मिळाला पाहिजे असे प्रयत्न सुरू आहेत. त्यामध्ये हे रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

या रुग्णालयात अतिशय आधुनिक अशा गामा स्कॅन, पेट स्कॅन आदींसह उपचार सुविधा सामान्य नागरिकांना केंद्र सरकारच्या सीजीएचएस योजनेप्रमाणे अतिशय अल्प दरात मिळणार आहेत. शासनाच्या सर्व योजना या ठिकाणी मिळणार आहेत. कॅन्सर सारखा आजार वेगाने वाढत असताना त्याचे उपचार प्रदीर्घ व खर्चिक होतात. हे पाहता पुणेकरांसाठी हे रुग्णालय एक वरदान ठरेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

ते पुढे म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज हे बुधभूषण ग्रंथ लिहित आहेत अशा स्वरूपाचे शिल्प छत्रपती संभाजी उद्यान येथे उभारले आहे. ११ भाषा ज्ञात असलेले छत्रपती संभाजी महाराज यांनी वयाच्या १४ व्या वर्षी हा संस्कृत ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे इतिहासाचा प्रत्यक्ष नमुना आहे. या ग्रंथातील १० श्लोकांचा शिल्पात समावेश केला असून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शहाजी महाराज यांचे व्यक्तिमत्व त्यातून समजण्यास मदत होते.

समान पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यात

समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत आज लोकार्पण झालेल्या पाण्याच्या टाक्यांमुळे दोराबजी पॅराडाईज, महंमदवाडी, एनआयबीएम या सर्व भागात समान पाणी पोहोचणार आहे. २०१५ साली पुण्यात वितरण व्यवस्था चांगली झाली पाहिजे असा आम्ही निर्णय घेतला. पुण्यात देशात सर्वाधिक पाणी वापर दिसत होता. त्याचे कारण ४० ते ५० टक्के पाण्याची गळती होत होती. त्यामुळे समान पाणीपुरवठा योजना राबवून वितरण व्यवस्था अधिक चांगली करण्याचा निर्णय घेतला. त्यातून पाण्याचा नाश टाळून प्रत्येक व्यक्तीपर्यंत पाणी पोहोचवता यासाठी २०१७ साली या योजनेला मान्यता दिली. येथील लोकप्रतिनिधींनीही सतत पाठपुरावा केला. ही योजना हळूहळू अंतिम टप्प्यात चालली आहे याचा आनंद आहे, असेही ते म्हणाले.

लोकांना पाणी मिळाले तर जे आशीर्वाद मिळतात त्यापेक्षा मोठे आशीर्वाद कुठलेही नाहीत. उरलेले काम पूर्ण व्हावे यासाठी २ महिन्यात आढावा बैठक घेऊन गती देण्यात येईल. ही योजना पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक पुणेकराला 'रोज पाणी, शाश्वत पाणी, शुद्ध पाणी, सातत्यपूर्ण पाणी' देऊ शकू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. वाढलेली लोकसंख्या, नवीन समाविष्ट झालेल्या गावांसाठी पाणी पुरवठ्यासाठी १२ गावांची पाणीपुरवठा योजना मंजूर करून त्यासाठी ८९० कोटी रुपये दिले. तसेच केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंड मधूनही निधी उपलब्ध झाला आहे. त्यातून खडकवासला, नांदेड, नांदोशी, किरकिटवाडी, धायरी, जांभूळवाडी, भिलारवाडी आदी भागातही मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, शासन आणि खासगी क्षेत्र एकत्र आल्यानंतर जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळतात हे कर्करोग रुग्णालय हे उदाहरण आहे. आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचे बुधभूषण ग्रंथ लिहितानाचे शिल्प केवळ पाहण्यासाठी नाही त्यांच्यासारखा कणखर बाणा आणि स्वराष्ट्राचा अभिमान सर्वांमध्ये जागृत करण्यासाठी प्रेरणा देईल, असेही श्रीमती पवार म्हणाल्या. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर या नऊ टाक्यामुळे येथील जनतेला पुरेशा दाबाने पाणी मिळेल. पाणी हे जीवन असून पाण्याची बचत करणे महत्वाचे आहे असेही त्या म्हणाल्या. मेट्रोच्या पुलामुळे प्रवासाचा वेळ वाचणार असून इंधनाची बचत होणार आहे. कामांच्या गुणवत्तेबरोबरच, भविष्यातील विचार करून नियोजन करण्यावर दिवंगत अजित पवार यांचा भर होता. त्यांच्या भूमिकेनुसार विकास कामे करण्यावर भर दिला जाईल.

प्रास्ताविकात महापौर श्रीमती नागपुरे म्हणाल्या, 'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' या धर्तीवर 'विकसित पुणे' या संकल्पनेनुसार पुणे शहराला सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी काम सुरू आहे. समान पाणीपुरवठा योजनेतील पाण्याच्या पाण्याच्या टाक्या कार्यान्वित झाल्यामुळे ३ लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा होणार आहे. पुणेकरांच्या वाहतुकीला गती आणि वाहतुकीला अत्याधुनिक रूप देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. खराडी ते महात्मा फुले चौकदरम्यान मेट्रोसह दुमजली पुलामुळे खराडीकरांना मोठा दिलासा मिळणार आहे, असेही त्या म्हणाल्या.

आमदार योगेश टिळेकर म्हणाले, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी २०१५ मध्ये २ हजार ८०० कोटी रुपयांची समान पाणीपुरवठा योजना जाहीर करून आता कार्यान्वित केली. म्युनिसिपल बाँड च्या माध्यमातून निधी उभा केला. पुणे आणि हडपसरच्या रस्ते, पाणीपुरवठा, विकासासाठी मुख्यमंत्र्यांनी निधीची उपलब्ध करून दिला.

तत्पूर्वी सकाळी प्रभाग क्र. ९ मधील सर्वे क्र. ४७ पी, मारुती चौक, बाणेर येथील पुणे महानगरपालिका व आपुलकी हेल्थकेअर यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील कर्करोग रुग्णालयाचे लोकार्पण, पुणे महानगरपालिकेच्यावतीने उभारलेल्या छत्रपती संभाजी महाराज उद्यान, जंगली महाराज रोड येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. मोहम्मद वाडी येथील कार्यक्रमात प्रभाग क्रमांक ४१ व १९ मोहम्मदवाडी येथील समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत नऊ पाण्याच्या साठवण टाक्यांचे लोकार्पण तसेच मुंढवा येथील महात्मा फुले चौक ते खराडी मेट्रो समवेत दुमजली उड्डाणपुलाचे ऑनलाइन भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समिती अध्यक्ष

श्रीनाथ भिमाले यांच्यासह महानगरपालिकेचे पदाधिकारी, स्थानिक नगरसेवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोंदू बाबा अशोक खरातचा ५२ कोटींचा काळा खेळ उघड; परदेशात पळण्याचा डाव फसला





**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक सिन्नरमधील मिरगाव येथील तथाकथित ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ कॅप्टन अशोक खरात याला महिला अत्याचाराच्या गंभीर आरोपांवरून अटक करण्यात आली. या घटनेनंतर आता अशोक खरात प्रकरणी धक्कादायक माहिती समोर येत आहे. प्रसिद्ध भोंदू बाबा अशोक खरात याने पोलिसांच्या कारवाईचा ससेमिरा पाठीमागे लागताच, अवघ्या ३ महिन्यांच्या कालावधीत वेगवेगळ्या बेनामी बँक खात्यांमधून तब्बल ५२ कोटी रुपयांची रोकड फस्त केल्याचे उघडकीस आले आहे. अटक होण्यापूर्वी हा संपूर्ण काळा पैसा पांढरा करून परदेशात पळून जाण्याचा खरातचा डाव होता, अशी माहिती आता समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डिसेंबर २०२५ मध्ये वावी पोलीस ठाण्यात संशयित जासूद आणि परब यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याची झळ आपल्यापर्यंत पोहोचणार आणि आपणही अडकणार याची कुणकुण भोंदू अशोक खरातला लागली होती. त्यामुळे त्याने स्वतःला वाचवण्यासाठी आणि पैशांची विल्हेवाट लावण्यासाठी एक युक्ती शोधली. त्याने जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ दरम्यान अटक होईपर्यंत विविध बँकांमधून मोठ्या प्रमाणावर रक्कम काढण्यास सुरुवात केली.

तपासात समोर आलेली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, हा सर्व काळा पैसा सुरक्षित करण्यासाठी त्याने तब्बल ६५ बनावट बँक खाती उघडली होती. यानंतर पोलिसांच्या आणि प्राप्तीकर विभागाच्या नजरेतून सुटण्यासाठी खरात आणि त्याच्या साथीदारांनी अवघ्या ४ दिवसांत या खात्यांमधून २०० हून अधिक आर्थिक व्यवहार केले. या वेगवान व्यवहारांद्वारे त्यांनी ५२ कोटी रुपये बँकेतून काढून घेतले.

अशोक खरातला आपल्यावरील कायदेशीर कारवाईची पूर्ण कल्पना आली होती. त्यामुळेच अटक होण्यापूर्वी त्याने हा अवाढव्य काळा पैसा पांढरा करायचा आणि भारतातून थेट परदेशात पलायन करायचे, अशी संपूर्ण योजना त्याने आखली होती. मात्र, त्यापूर्वीच पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. त्यामुळे त्याचे विदेशात पळण्याचे मनसुबे धुळीस मिळाले. या मोठ्या आर्थिक गैरव्यवहारामुळे आता या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय किंवा प्राप्तीकर विभाग देखील चौकशी करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# कल्याणकरांची सावलीच गायब! 'शून्य सावली दिवस'



**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याणकरांना आज जगावेगळा अनुभव घेता आला. म्हणजे एवढं रणरणतं ऊन असतानाही उन्हात उभं राहूनही सावली अचानक गायब झाल्याचा अनुभव कल्याणकरांनी घेतला. भर उन्हात आपल्यामागे आपली सावली दिसत असते. कधी पुढे तर कधी सावली असते म्हणजे असते. पण आज कल्याणकरांच्या डोक्यावर तळपता सूर्य होता. पण त्यांची सावलीच गायब झाली होती. बरं एकादोघांना हा अनुभव आला नाही तर अनेकांना आला. त्यामुळे अय्या हे काय घडलं? असे शब्द त्यांच्या तोडून अपसूक आल्याशिवाय राहिले नाही.

मैदानात रणरणत्या मैदानात ५० जण रणरणत्या उन्हात साखळी करून उभे राहिले आणि विज्ञानाचा हा चमत्कार त्यांनी याची डोळा याची देही अनुभवला. आकाश मित्र मंडळ आणि सुभेदारवाडा कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी कल्याण येथील सुभाष मैदानावर 'शून्य सावली दिवस निरीक्षण' कार्यक्रम उत्साहात पार पडला. या विशेष खगोलीय घटनेचे निरीक्षण करण्यासाठी विद्यार्थी, विज्ञानप्रेमी आणि खगोल अभ्यासकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

कार्यक्रमात आकाश मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ खगोल अभ्यासक हेमंत मोने यांनी 'शून्य सावली दिवस' ही घटना नेमकी कशी घडते, वर्षातून ती कधी अनुभवायला मिळते आणि त्यामागील खगोलशास्त्रीय कारणे कोणती, याचे सोप्या आणि रंजक भाषेत मार्गदर्शन केले. सूर्य पृथ्वीच्या अगदी डोक्यावर येत असल्याने काही क्षणांसाठी वस्तूंची सावली दिसेनाशी होते, ही या घटनेची वैशिष्ट्यपूर्ण बाब असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ खगोल अभ्यासक व शास्त्रज्ञ अरविंद कोलगे यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शून्य सावली निरीक्षण दाखवून उपस्थितांना या खगोलीय घटनेचा अनुभव दिला. विद्यार्थ्यांनी आणि विज्ञानप्रेमींनी विविध प्रयोग व निरीक्षणांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले. आकाशमित्र मंडळाचे सदस्य तथा खगोल अभ्यासक विद्येश कुलकर्णी, संजय पांडे, निखिल गेडाम आणि अर्चित गोखले यांनीही शून्य सावली दिवसाचे वैज्ञानिक महत्त्व आणि खगोल अभ्यासातील त्याची उपयुक्तता याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमाला माजी आमदार नरेंद्र पवार, प्रा. राजेंद्र कवठेकर यांच्यासह ५० जण उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे आणि भविष्यातील शास्त्रज्ञ घडविण्यासाठी प्रोत्साहन देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. विज्ञानप्रेमींनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

# द्रोणागिरीत विराट हिंदू संमेलन; भगव्या जल्लोषात हिंदू एकतेचा संदेश

**उरण । प्रतिनिधी**

ज्या भूमीला रामायणाचा वारसा लाभला आहे, त्या द्रोणागिरीतील प्रत्येक हिंदूने आपल्या अस्तित्वासाठी आता एकत्र येण्याची वेळ आली आहे. षंढपणा सोडून, धर्माभिमान पेटवून या विराट संमेलनाला उपस्थिती लावत हिंदूंनी आपली धर्माप्रती असलेली निष्ठा व्यक्त केली. प्रभू श्रीरामाच्या कार्यात हनुमंताने उचललेला द्रोणागिरी पर्वत नेताना जो तुकडा खाली पडला, तोच हा ऐतिहासिक द्रोणागिरी, असा गौरवशाली दाखला या भूमीला दिला जातो. त्यातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने संपूर्ण देशभर हिंदू संमेलनांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, सकल हिंदू समाज द्रोणागिरी उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले 'विराट हिंदू संमेलन' प्रचंड जल्लोषात आणि उत्साहात संपन्न झाले.

१७ मे रोजी सायंकाळी ६:०० वाजता, सेक्टर ५०, द्रोणागिरी येथील देवकृपा सोसायटीसमोर हा भव्य सोहळा पार पडला. या संमेलनाला द्रोणागिरी आणि उरण परिसरातील हिंदू समाज अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होता. या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य ठरले म्हणजे यात कोणताही राजकीय पक्ष किंवा मान-सन्मान हा विषय नव्हता. कोणत्याही राजकीय हेतू अजंठा बाजूला ठेवून केवळ आणि केवळ हिंदू धर्माबद्दल कमालीचा आदर आणि धर्माप्रती असलेली निष्ठा जपण्यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, जे या संमेलनाचे सर्वात मोठे यश ठरले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेच्या भव्य दिंडी सोहळ्याने झाली. या दिंडीसोबत सुरू असलेला हरिपाठ, अभंगांचे सूर आणि हातात घेतलेले भगवे झेंडे यामुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. या दिंडीच्या माध्यमातून संपूर्ण द्रोणागिरी मध्ये एक अभूतपूर्व भगवे चैतन्य निर्माण झाले होते. दिंडी परतल्यानंतर व्यासपीठावर राम भक्तीपर गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम बालचमूंनी सादर केले. शंख वादन गणेश वंदनेने उपस्थितांची मने जिंकली. जय श्रीरामगर्व से कहो हम हिंदू है छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि छत्रपती संभाजी महाराज की जय या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण द्रोणागिरी परिसर दणाणून गेला होता. या कार्यक्रमात डॉ निवेदिता भदाणे यांनी सादर केलेला अप्रतिम कथक नृत्य आविष्कार सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

संमेलनात उपस्थित प्रमुख वक्त्यांनी सनातन हिंदू धर्मावर आणि सद्यस्थितीवर प्रखर विचार मांडले. रमेश यादव महाराज यांनी सनातन हिंदू धर्म विषयी प्रखर विचार मांडले तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगातील रचनेचा दाखला देत त्यांनी उपस्थित त्यांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले महामंडलेश्वर रामकृष्ण सरस्वती महाराज यांनी हिंदू धर्माला वाचवण्यासाठी हिंदूंनी काय करावे लागेल यावर सखोल प्रकाश टाकला परप्रांतीयांचा



आपल्या हिंदु राष्ट्रात वाढणारा वावर आणि त्याचे होणारे परिणाम यावर त्यांनी आपले अत्यंत घनाघाती विचार मांडले राजेश कुंटे धर्म जागरण प्रमुख कोकण प्रांत यांनी अत्यंत समावेशक मुद्दे मांडले हिंदू धर्म संस्कृती आणि पर्यावरण यांचा कसा कनिष्ठ संबंध यावर अभ्यासपूर्ण आणि अत्यंत सुंदर मार्गदर्शन केले.

या ऐतिहासिक संमेलनाला उपस्थित राहिलेल्या सर्व हिंदू बांधवांसाठी आयोजकांच्या वतीने स्वागत पेय आणि महाप्रसादाची अत्यंत उत्तम व्यवस्था करण्यात आली या भूतपूर्व सोहळ्यांनी द्रोनागिरी परिसरातील प्रत्येक हिंदूंच्या रोमा रोमात असताना तर हिंदू धर्माबद्दलचा कमानीचा गर्व जागा केला हातवे वेळी कार्यक्रम नव्हता तर हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी आणि आपल्या ज्या अस्मितेसाठी पेटलेली एक वजन होती हिंदू ने आपल्या अस्तित्वासाठी सुरक्षेसाठी हिंदू राष्ट्राच्या कल्पनेसाठी एकजूट करून हिंदू धर्मावर येणारे प्रत्येक संकट परतवून लावण्यासाठी सज्ज झाले पाहिजे असा संदेश या विराट संमेलनातून संपूर्ण देशभर गेला. आयोजकांकडून आलेल्या मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन आतिश पाटील यांनी केले होते.

## थोडक्यात

### प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराचा खरा पाया देउबाई पाटील यांनी घातला



**रायगड । प्रतिनिधी**

परंपरागत माहिती आणि उपलब्ध ऐतिहासिक नोंदींनुसार, १९ नोव्हेंबर १८०१ रोजी लक्ष्मण विठू पाटील आणि देउबाई पाटील यांनी सिद्धिविनायक मंदिराच्या उभारणीचा पाया घातला. मूलबाळ नसल्याच्या वेदनेतून आणि समाजातील उपेक्षेला उत्तर म्हणून उभारलेले मंदिर; देउबाई पाटील यांच्या योगदानाला न्याय मिळण्याची मागणी.मुंबईच्या प्रभादेवीतील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर आज भक्ती, श्रद्धा आणि वैभवाचे प्रतीक मानले जाते. मात्र या मंदिराच्या उभारणीमागे एका स्त्रीची वेदना, करुणा आणि सामाजिक जाणीव दडलेली आहे, हे फारच कमी लोकांना माहिती आहे. १९ नोव्हेंबर १८०१ रोजी आगरी-कोळी समाजातील देउबाई पाटील आणि त्यांचे पती लक्ष्मण विठू पाटील यांनी हे मंदिर उभारल्याची परंपरागत माहिती आणि स्थानिक इतिहासात उल्लेख आढळतो.

देउबाई पाटील यांना स्वतःला मूलबाळ नव्हते. त्या काळात मुल नसलेल्या महिलांकडे समाज कसा पाहायचा, किती उपेक्षा आणि टोमणे सहन करावे लागत, हे आज कल्पनेपलीकडचे वाटेल. पण याच दुःखातून त्यांनी एक असा निर्णय घेतला, जो आजही समाजाला विचार करायला लावणारा आहे. जे दुःख माझ्या वाट्याला आलं, ते इतर कोणत्याही महिलेच्या वाट्याला येऊ नये या भावनेतून त्यांनी श्री सिद्धिविनायक मंदिर उभारणीला पुढाकार दिला, अशी माहिती पुढे येते.

ही केवळ मंदिराची बांधणी नव्हती. ती होती एका स्त्रीच्या वेदनेतून जन्मलेली सामाजिक जाणीव. स्वतःच्या दुःखाचे रूपांतर त्यांनी लोकांच्या श्रद्धास्थानात केले. त्यामुळे सिद्धिविनायक मंदिराचा इतिहास हा केवळ धार्मिक नाही, तर मानवी संवेदना, स्त्रीमनाची ताकद आणि समाजहिताचा इतिहासही ठरतो.

मात्र इतके मोठे योगदान देऊनही देउबाई पाटील इतिहासातून गायब कशा झाल्या, हा खरा प्रश्न आहे. याचे उत्तर इतिहासलेखनाच्या जुन्या पद्धतीत दडलेले आहे. पूर्वीचा इतिहास प्रामुख्याने राजे, युद्धे, सत्ता आणि मोठ्या घराण्यांभोवतीच लिहिला गेला. सामान्य माणसे, स्थानिक समाज, स्त्रिया आणि विशेषतः आगरी-कोळी समाजाचे योगदान नोंदींमध्ये कमी राहिले. त्यामुळे देउबाई पाटील यांसारख्या कर्तृत्ववान महिलांचे श्रेय इतिहासाच्या पानांवरून मागे ढकलले गेले. आज प्रश्न केवळ इतिहासाचा नाही, तर न्यायाचा आहे. ज्यांनी पाया घातला, ज्यांनी भावना दिल्या, ज्यांच्या त्यागातून एक श्रद्धास्थान उभे राहिले, त्यांचे नाव पुढे आलेच पाहिजे. कारण इतिहास हा फक्त सत्ताधाऱ्यांचा नसतो; तो सामान्य लोकांच्या कर्तृत्वाचाही असतो. देउबाई पाटील यांचे नाव सिद्धिविनायक मंदिराच्या इतिहासात ठळकपणे नमूद होणे ही केवळ औपचारिकता नाही, तर त्यांना दिलेला खरा सन्मान ठरेल.

आज लाखो भाविक सिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी येतात. पण या मंदिरामागची ही वेदनादायी आणि प्रेरणादायी कहाणी अनेकांना माहीतच नसते. श्रद्धास्थानाचे महत्त्व केवळ देवतेत नसते, तर ते उभारणाऱ्या हातांच्या त्यागातही असते. म्हणूनच देउबाई पाटील यांच्या योगदानाला उजेडात आणणे ही काळाची गरज आहे. देउबाई पाटील यांचे नाव सिद्धिविनायक मंदिराच्या इतिहासात पुन्हा ठळकपणे लिहिले जाणे म्हणजे केवळ एका स्त्रीचा गौरव नव्हे, तर इतिहासाने विसरलेल्या असंख्य स्त्री-कर्तृत्वांना न्याय देण्याची सुरुवात आहे.

# पुढील वर्षापासून ‘पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा’ राज्यव्यापी; प्रथम पुरस्कार दिवंगत अजित पवार यांच्या नावाने देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे । प्रतिनिधी**

शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुढील वर्षापासून ‘पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा’ राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालय येथे आयोजित दुसऱ्या ‘पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा-२०२६’च्या समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने,महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासनाचा कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तपणे राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यामागे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष योगदान आहे. यंदाच्या स्पर्धेसाठी तब्बल १ हजार २९० अर्ज प्राप्त झाले असून विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गेल्या वर्षीच्या स्पर्धेतील चार संशोधन प्रकल्पांचे उत्पादन प्रत्यक्षात सुरू झाले असून आणखी १२ उत्पादने लवकरच बाजारात येणार आहेत. या स्पर्धेतून केवळ कल्पना मांडल्या जात नाहीत, तर त्या प्रत्यक्ष उत्पादनात उतरून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची क्षमता ठेवतात. यंदाच्या स्पर्धेतील १८ निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत व मार्गदर्शन देण्यात येणार असून त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही श्री. फडणवीस यांनी दिली.




प्रदर्शनात शेतीतील तंत्रज्ञानाचा प्रभावी वापराबाबत उपयुक्त नवकल्पना आहेत. उपग्रह नकाशांकन आणि मृदा परीक्षणाच्या आधारे जमिनीचे अचूक विश्लेषण करणारे नमुने, शेताच्या रचनेनुसार ओलावा व्यवस्थापन करून आवश्यक तेवढाच पाणीपुरवठा करणारी यंत्रणा, तसेच तण आणि पीक ओळखून स्वतंत्र फवारणी करणारे तंत्रज्ञान अशा विविध संकल्पनांचे मुख्यमंत्री यांनी विशेष कौतुक केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असून भविष्यात त्याची अचूकता आणखी वाढेल. पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी मानवरहित यंत्रे आणि उपग्रह नकाशांकनाच्या माध्यमातून अचूक अहवाल तयार करणारे तंत्रही उपयुक्त ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कृषी आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, बदलते हवामान, पाण्याची कमतरता, खतांची टंचाई, मजुरांची कमतरता आणि बाजारभावातील चढ-उतार या विविध आव्हानांना सामोरे जाताना कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. नवोपक्रमांना चालना देण्यासाठी आणि जागतिक पातळीवरील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. पुणे ग्री हॅकॅथॉन-२०२६ अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि तंत्रज्ञान प्रदर्शनाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. प्रत्येक स्टॉलवर थांबून त्यांनी संशोधकांशी आणि युवा उद्योजकांशी थेट संवाद साधत त्यांच्या संकल्पना समजून घेतल्या आणि त्यांच्या संशोधनाचे कौतुक करीत प्रोत्साहनही दिले. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाययोजना, स्मार्ट सिंचन प्रणाली, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा परीक्षण, स्वयंचलित उपकरणे तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध संशोधनात्मक प्रकल्पांविषयी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्सुकतेने माहिती घेतली. प्रकल्प सादर करणाऱ्या तरुणांच्या कल्पकतेचे त्यांनी कौतुक करत कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोठे परिवर्तन घडवून आणण्याची गरज अधोरेखित केली.

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर सोमय्यांचं महापौरांना पत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

बकरी ईद तसेच इतर प्रसंगी मुंबईत सोसायट्या, चाळी आणि खुल्या जागांमध्ये होणाऱ्या बकऱ्यांच्या कत्तलींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजप नेते आणि माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांनी मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात सोमय्या यांनी महापौरांना पत्र लिहिले आहे. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर खुल्या जागेतील बकऱ्यांच्या कत्तलीवर कारवाईची मागणी या पत्राद्वारे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केली आहे.



बकरी ईदच्या निमित्ताने काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने उघड्यावर बकऱ्यांची कत्तल केली जाते. महानगरपालिका आणि न्यायालयाने याबाबत वेळोवेळी निर्बंध घालूनही काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मुंबईतील कोणत्याही वस्ती किंवा निवासी परिसराच्या जवळ बकऱ्यांचे बलिदान किंवा कत्तल कायद्यानुसार करता येत नाही, असे नमूद करत संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना कठोर सूचना देण्याची मागणी सोमय्या यांनी केली आहे. तसेच महानगरपालिकेच्या नियमांचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी प्रशासनाने तातडीने निर्देश द्यावेत, अशी विनंतीही त्यांनी पत्रातून केली आहे. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून, यावर महापालिका प्रशासन काय भूमिका घेते याकडे लक्ष लागले आहे.

यंदा बकरी ईद २७ मे २०२६ रोजी होण्याची शक्यता आहे. अर्थात चंद्र दर्शन होईपर्यंत ही तारीख निश्चित मानली जात नाही. या मुस्लिम सणापूर्वी प्रशासनाने त्यांच्या पातळीवर तयारी सुरू केली आहे. मुस्लिम बांधवांमध्ये बकरी ईदचे विशेष महत्त्व आहे. महापालिकेने मुंबईत १०९ ठिकाणी कुर्बानी देण्यास परवानगी देण्यात आली आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला बृहन्मुंबई महानगरपालिकेने (इचउ) बकरी ईदच्या निमित्ताने देवनार कत्तलखान्यात विविध सोयी-सुविधा देण्यास सुरूवात केली. आतिरिक्त महापालिका आयुक्त डॉ. आश्विनी जोशी यांनी याविषयीची माहिती दिली. त्यानुसार, कत्तलखाने उउढत देखरेखी खाली असतील. याठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात असतील. पार्किंग, फूड कोर्ट, आरोग्य सेवा आणि स्वच्छतेची व्यवस्था करण्यात आली आहे.

## नीट पेपरफुटीमागे भाजप नेते - संजय राऊत

**मुंबई । प्रतिनिधी**

देशभरातील वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी NEET-UG 2026 परीक्षा पेपरफुटीमुळे वादात सापडली आहे. यामुळे नीट परीक्षा रद्द करण्यात आली होती. या प्रकारामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केंद्र आणि राज्य सरकारसह न्यायव्यवस्थेवर अत्यंत तिखट शब्दांत प्रतिक्रिया दिली. नीट पेपर फुटी प्रकरणामागे सर्व भाजपचेच नेते आहेत, असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला.

संजय राऊत यांनी नुकतंच मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नीट पेपरफुटी प्रकरणावरुन केंद्र आणि राज्य सरकारसह न्यायव्यवस्थेवर अत्यंत तिखट शब्दात टीका केली. नीट पेपर फुटी प्रकरणापासून ते व्हीआयपी सुरक्षा आणि न्यायधीशांच्या भूमिकेपर्यंत अनेक मुद्द्यांवर त्यांनी भाजपला धारेवर धरले. नीट पेपर फुटी प्रकरणामागे सर्व भाजपचेच नेते आहेत. सध्याचे राज्यकर्ते कोण आहेत? या संपूर्ण गैरव्यवहाराला आणि त्यामुळे झालेल्या तीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांना भाजपचे लोकच जबाबदार आहेत, असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला.

देवेंद्र फडणवीस हे जेव्हा विधानभवनात बाईकवरून जात होते, तेव्हा पूर्ण रस्ता अडवण्यात आला होता. भाजपच्या नेत्यांनी या ढोंगी प्रवृत्तीतून आता बाहेर पडायला हवे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत ते म्हणाले, अमित शहा यांनी त्यांचा ताफा कमी केला का? दिल्लीतले तीन रस्ते केवळ त्यांच्या सुरक्षेसाठी बंद असतात. मग तुम्ही कसल्या ताफे काढण्याच्या गोष्टी करताय? असेही संजय राऊतांनी विचारले.

देश संकटात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी कुठे आहेत? ते युरोपमधील ७ देशांच्या दौऱ्यावर आहेत. निवडणूक संपल्यावर देश संकटात आहे हे समजले का? मोदी दोन गाड्या घेऊन दिल्लीत फिरत होते. तुम्ही काय पंडित नेहरू किंवा इंदिरा गांधी आहात का? मोदींनी देशातील परिस्थितीवर चिंता कुठे व्यक्त केली? तर नेदरलँडमध्ये! आपल्या देशातील संस्कृती किती लोप पावत चालली आहे, याचे भान त्यांनी ठेवावे. ट्रम्प-निर्भर नव्हे, तर भारत खऱ्या अर्थाने मुक्त झाला पाहिजे, असे संजय राऊत म्हणाले.

## भरतीच्या बोगस जाहिरातींपासून सावध राहण्याचे मंत्री भरत गोगावले यांचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**



‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना’अंतर्गत महाराष्ट्रात विविध पदांसाठी तात्काळ भरती सुरू असल्याची बोगस जाहिरात सोशल मीडियाद्वारे प्रसारित करण्यात येत आहे. अशा जाहिरातींना बळी पडून सर्वसामान्य नागरिक व बेरोजगार युवकांचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन रोजगार हमी योजना विभागाचे मंत्री भरत गोगावले यांनी केले आहे. या प्रकरणी संबंधित अज्ञात व्यक्तींविरोधात मरीन लाईन्स पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

‘रोजगार हमी योजना विभागांतर्गत महाराष्ट्रात तात्काळ भरती! स्थिर नोकरीची आकर्षक संधी!’ अशा आशयाची जाहिरात व्हॉट्सपद्वारे राज्यभर व्हायरल करण्यात आली आहे. या जाहिरातीत कार्यक्रम तांत्रिक अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी आणि क्लार्क कम डेस्क ऑफिसर पदांसाठी भरती सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर जाहिरातीत नोंदणीसाठी १ हजार ५०० रुपये शुल्क भरण्याची अट घालण्यात आली असून, ५८ वर्षांच्या कराराधारित नियुक्तीचे आमिष दाखविण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना मंत्री भरत गोगावले यांनी म्हटले आहे की, अशी कोणतीही भरती प्रक्रिया शासनामार्फत सुरू नसून संबंधित जाहिरात पूर्णपणे खोटी व दिशाभूल करणारी आहे. शासनाकडून थेट भरतीसाठी कोणतीही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

यामुळे विशेषतः ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असून या बोगस जाहिरातीमुळे शासनाची प्रतिमा मलीन होत असल्याने संबंधित अज्ञात व्यक्तींविरोधात कठोर कारवाई करण्याबाबत विभागामार्फत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## भिवंडीत सख्ख्या भावानेच दिली भावाच्या हत्येची सुपारी

**मुंबई । प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील शेडगाव येथे कामावर निघालेल्या ४० वर्षीय व्यक्तीची निर्घृणपणे हत्या केल्याची घटना १२ मे रोजी उघडकीस आली होती. या घटनेने संपूर्ण परिसर हादरुन गेला होता. गणेशपुरी पोलिसांसोबतच स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकांनी अथक प्रयत्नातून या हत्येच्या गुन्ह्यातील चार आरोपींना गजाआड करण्यात यश मिळवले आहे. यामध्ये हत्येची सुपारी देणाऱ्या सख्ख्या भावाचा सुद्धा समावेश आहे.



पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार १२ मे रोजी तालुक्यातील शेडगाव या गावातील परेश टोलाराम पाटील वय ४० वर्ष हा पाऊणे नऊ वाजताच्या सुमारास दुचाकी वरुन वसई येथे कामावर जात असताना वाशिंद-अंबाडी रोड शेडगाव फाटा या दरम्यान गावतलावा जवळ कोणीतरी अज्ञात व्यक्तीने हत्याराने डोक्यावर वार करून गंभीर जखमी करून हत्या केली होती. याबाबत त्याचा भाऊ नरेश पाटील वय ३७ याने गणेशपुरी पोलिस ठाण्यात हत्येच्या गुन्ह्याची फिर्याद दिली होती. या हत्येने परिसर हादरून गेला असताना गणेशपुरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कमलेश बच्छाव व स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप गिते यांच्या नेतृत्वा खाली सात पोलीस उपनिरीक्षक यांची पथके तयार करून तपास सुरू केला. या पोलिस पथकाने अथक परीश्रम घेऊन २०० सीसीटीव्ही कॅमेरे पाहणी केली तसेच, तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून गुन्ह्यात आरोपींनी गुन्हा करण्या करीता वापरलेल्या वाहनाचा क्रमांक प्राप्त करून गुन्ह्यातील आरोपी राकेश भगवान पाटील, प्रेमजीत मधुकर घरत, दक्षत भानुकांत भोईर सर्व रा.आगरवाडी केळवा जि.पालघर यांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडे गुन्ह्याच्या तपासात त्यांनी हत्येची कबुली दिली.

गुन्ह्यात फिर्यादी असलेला मृत परेश याचा सख्खा भाऊ नरेश टोलाराम पाटील याने मारण्याची सुपारी देऊन भावास जीवे ठार मारण्याचा कट रचला असल्याचे कबुल केल्याने या गुन्ह्यात चार ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. जमिनीच्या वादातून सख्ख्या भावाने भावाच्या हत्येची सुपारी दिली होती. मयत परेश व आरोपी नरेश हे सख्खेभाऊ असून त्यांची सामायिक शेत जमीन मोठा भाऊ परेश याने आपल्या नावे करून घेतली होती, तसेच घर सुद्धा आपल्या नावे केले होते. या गोष्टीचा राग मनात धरून छोटा भाऊ नरेश याने दहा लाख रुपयांची आपल्या भावाच्या हत्येची सुपारी केळवा पालघर येथील गुंडांना दिली होती.

## NEET पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई; लातूरच्या क्लासेस संचालकाला CBI कडून अटक

**लातूर । प्रतिनिधी**

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे सध्या लातूर पुन्हा एकदा रडारवर आले आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे लातूरमध्ये आढळल्याने गेल्या तीन दिवसांपासून लातूरमध्ये सीबीआयने मुक्काम ठोकला आहे. या प्रकरणातील आरोपींची कसून चौकशी सुरू आहे. तसेच पुण्यातही सीबीआयच्या कार्यालयात काहीजणांना चौकशीसाठी बोलावलं आहे. त्याशिवाय नांदेड आणि नाशिकमधूनही सीबीआयच्या हाती महत्त्वाचे धागेदोरे लागले असल्याचं सांगितलं जात आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयकडून आरसीसी पॅटर्नचे संचालक प्रा.शिवराज मोटेगावकर यांची रात्रभर चौकशी सुरू होती. त्यानंतर आज पुन्हा सकाळी माटेगावकर यांची चौकशी करण्यात आली. माटेगावकरांची पुण्यातील सीबीआयच्या कार्यालयात ही चौकशी सुरू होती. तसेच लातूरच्या आरसीसी क्लासमध्येही गेल्या काही तासांपासून इतरांची ही चौकशी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, आता सीबीआयने माटेगावकर यांना अटक केली आहे. तसेच माटेगावकरच्या लातूर येथील घराबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



नांदेडनंतर आता लातूरमध्ये पुन्हा खासगी क्लासेसच्या कार्यालयात चौकशी करण्यात आली आहे. काल सायंकाळी सीबीआयच्या पथकाने क्लासेस एरियात जाऊन चौकशी केली. नीट परीक्षा गैर व्यवहार प्रकरणात लातूरच्या क्लासेस चालकांचा काही संबंध आहे का? हे तपासले जात आहे. गेस पेपरमधील ४२ प्रश्न तंतोतंत नीट परीक्षेत जुळल्याच्या तक्रारी नंतर क्लासेस भागातही चौकशी सुरू आहे.

लातूरमध्ये सीबीआयने पुन्हा खासगी कोचिंग क्लासेसच्या कार्यालयात चौकशी सुरू केली होती. पीव्ही कुलकर्णी आणि खासगी कोचिंग क्लासेसचा संचालकांचे सबंध असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आज पुणे सीबीआय कार्यालयात खासगी कोचिंगच्या संचालकाला नोटीस देत सीबीआयने चौकशीला बोलावल्याची माहिती समोर आली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून अटक करण्यात आलेल्या जीवशास्त्राच्या अध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरे हिला दिल्लीतील केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष न्यायालयाने १४ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. नीट पेपरफुटी प्रकरणी विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांमध्ये संतापाचे वातावरण आहे. पुण्यात आज एनएसयूआय मॉडर्न महाविद्यालयाबाहेर आंदोलन करणार आहे. त्यामुळे महाविद्यालया बाहेरच्या गेटवर पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला आहे. पेपरफुटी प्रकरणातील आरोपी मनीषा मांढरे या सीबीआयच्या अटकेत आहेत. त्या याच महाविद्यालयातील प्रोफेसर होत्या. त्यांचा निषेध करण्यासाठीच एनएसयूआय निदर्शने करणार आहे.



## संक्षिप्त

### प्रेयसीचा बर्थडे साजरा करण्यासाठी आईचे लाखोंचे दागिने चोरीला

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईच्या गोरेगाव पूर्वमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. गर्लफ्रेंडचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मुलानेच आईचे लाखो रुपयांचे दागिने चोरल्याची धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दिंडोशी पोलिसांनी आरोपी प्रियंशू गुप्ता याला अटक केली आहे. त्याच्या प्रेयसीलाही आरोपी करण्यात आले आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने आईचे दागिने विकून गर्लफ्रेंडसोबत वाढदिवसाची पार्टी आणि ड्रग्सवर पैसे उडवल्याची कबुली दिली आहे. साधारण ३ लाख ३२ हजार रुपयांच्या चोरी प्रकरणी पोलिसांनी ३३ ग्रॅम सोने आणि २२ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त केले आहेत. चोरीतील जवळपास ८८ टक्के मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला असून दागिने खरेदी करणाऱ्यांचाही तपास सुरू आहे. दिंडोशी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

### कामगारांच्या शोषणा विरोधात 'अखिल भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघ' आक्रमक

**उरण । प्रतिनिधी**

देशातील प्रमुख ११ बंदरांमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर आणि कंत्राटी कामगारांच्या शोषणावर चर्चा करण्यासाठी 'अखिल भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघाची' महत्त्वपूर्ण राष्ट्रीय कार्यकारणी बैठक उरण जवळील नागाव येथे नुकतीच संपन्न झाली. 'न्हावा शेवा बंदर कामगार संघटना' अंतर्गत या बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत देशातील बंदरांचे खाजगीकरण आणि कामगारांच्या छळाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

देशाच्या सुरक्षेच्या आणि आयात-निर्यातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणारे बंदर उद्योग सध्या देशी व विदेशी खाजगी कंपन्यांच्या घशात घातले जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. बंदरांमधील कायमस्वरूपी कामगारांची संख्या कमी करून त्याजागी कंत्राटी कामगारांची भरती केली जात आहे. समान काम करणाऱ्या या कंत्राटी कामगारांना अत्यंत तुटपुंजा पगार देऊन राबवून घेतले जात आहे. जेएनपीए मधील सिंगापूर पोर्ट आणि गुजरात मधील अदानी समूहाचे मुंद्रा पोर्ट येथे कामगारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण होत असून, या अन्यायाविरोधात देशव्यापी आंदोलन उभे करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

महासंघाचे सचिव कॉ. भूषण पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशातील पोर्ट आणि गोदी कामगारांचा चालू वेतन करार ३१ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे त्यामुळे एक जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०३१ या पुढील ५ वर्षांच्या नवीन वेतन करारासाठीचे मागणी पत्रक लवकरच तयार केले जाईल कायमस्वरूपी कामगारांसोबतच कंत्राटी कामगारांच्या ही पगार वाढीसाठी महासंघ पूर्ण ताकतीने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या महत्वपूर्ण बैठकीत जेष्ठ कामगार नेते व माजी खासदार कॉम्रेड तपन सेन तसेच ल२ चे राष्ट्रीय सचिव कॉम्रेड कुरुमालायन यांनी उपस्थित प्रतिनिधींना सविस्तर मार्गदर्शन केले बैठकीचे अध्यक्षपद महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष काँ. सी डी नंदकुमार यांनी भूषवलेतर वार्षिक अहवाल सरचिटणीस कॉम्रेड टि नरेंद्रराव यांनी सादर केला. देशातील विविध बंदरातून आलेल्या कामगार प्रतिनिधींनी यावेळी स्थानिक समस्यांवर सविस्तर चर्चा केली. महासंघाचे आगामी राष्ट्रीय अधिवेशन ऑक्टोबर महिन्यात चेन्नई बंदरात आयोजित केली जाईल अशी घोषणा यावेळी करण्यात आली.

ही राष्ट्रीय बैठक यशस्वी करण्यासाठी न्हावा शेवा बंदर कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष गणेश घरत अध्यक्ष दिनेश घरत सचिव राजेश घरत आणि नंदू म्हात्रे यांच्या व त्यांच्या सहकार्याने विशेष मेहनत घेतली.

# जालन्यात बनावट खतांचा महाघोटाळा उघड!..

## १८ लाखांचा संशयित अनधिकृत खतसाठा जप्त; शेतकरी फसवणुकीच्या रॅकेटचा पर्दाफाश..

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १७ रविवार रोजी दुपारी एक वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील नवीन मोंढा परिसरात शेतकऱ्यांची फसवणूक करून अनधिकृतरीत्या खतांचा साठा करणाऱ्या मोठ्या रॅकेटचा कृषी विभागाच्या भरारी पथकाने पर्दाफाश केला आहे.








या कारवाईत तब्बल १७६२ खताच्या गोण्या आणि सुमारे १८ लाख ७ हजार १८४ रुपयांचा संशयित खतसाठा जप्त करण्यात आला असून जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी खत निरीक्षक तथा कृषी अधिकारी रवि किसन राठोड यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार १५ मे रोजी विभागीय व जिल्हा भरारी पथकाने नवीन मोंढा येथील एपीएमसी मार्केटमधील गाळा क्रमांक एस.टी.-२६ येथे धाड टाकली. कारवाईदरम्यान चक २३ -ठ २४०० या ट्रकमधून मोठ्या प्रमाणात खताच्या गोण्या उतरविल्या जात असल्याचे दिसून आले.

तपासात EFFCO PDM² Potash, D-P, Neem Coated Urea, Zinc Biofertilizer, Organic Manure, PROM², Diatomite Silicon यांसह विविध प्रकारची खते आढळून आली. या संपूर्ण साठ्याची किंमत १८ लाखांहून अधिक असल्याचे स्पष्ट झाले. विशेष धक्कादायक बाब म्हणजे, ट्रकसोबत असलेल्या बिलामध्ये हा माल नांदेड येथील एत्रक्रऊज ऋशींीळश्रळशीी कडे विक्री झाल्याचे नमूद होते. मात्र प्रत्यक्षात तो जालना येथील जयभारत एग्रो ट्रेडर्सच्या अनधिकृत गोदामात उतरवला जात असल्याचे भरारी पथकाच्या निदर्शनास आले.

तपासादरम्यान जयभारत एग्रो ट्रेडर्सच्या खत विक्री परवान्यात संबंधित गाळ्याचा समावेश नसल्याचे उघड झाले. याबाबत प्रोप्रायटर आकाश प्रमोदसिंग बायस यांच्याकडे विचारणा केली असता समाधानकारक खुलासा देता आला नसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

भरारी पथकाने गोदामातील १२ प्रकारच्या खतांचे १३ नमुने तपासणीसाठी जप्त केले असून ते प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत. तसेच संपूर्ण गोदाम पंचांसमक्ष सील करण्यात आले. दरम्यान, या गोदामातील काही खतांचा तपशील यापूर्वी भोकरदन तालुक्यातील हसनाबाद पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या खत गैरव्यवहार प्रकरणाशी जुळत असल्याचेही तपासात समोर आले आहे. त्यामुळे अनुदानित खतांचा काळाबाजार, कृत्रिम टंचाई निर्माण करणे तसेच अनधिकृत री-पॅकिंगसाठी पुरवठा केल्याचा संशय अधिक गडद झाला आहे.

या प्रकरणी आकाश प्रमोदसिंग बायस (जयभारत एग्रो ट्रेडर्स, जालना), अनिल बाळाप्रसाद मंत्री (EFFCO Fertilizers, नांदेड) तसेच इतर अज्ञात व्यक्तींविरोधात खत नियंत्रण आदेश १९८५, अत्यावश्यक वस्तू कायदा आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कृषी विभागाच्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील बनावट व अनधिकृत खत विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून प्रशासनाने शेतकऱ्यांना अधिकृत विक्रेत्याकडून बिलासहच खत खरेदी करण्याचे आवाहन केले आहे.

# भिवंडीत प्रसूतीदरम्यान आई-बाळाचा मृत्यू; खासगी क्लिनिकवर निष्काळजीपणाचे आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील गायत्री नगर परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका खासगी क्लिनिकमध्ये प्रसूतीदरम्यान गर्भवती महिलेसह नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी कुटुंबीयांनी डॉक्टर आणि प्रसूतीची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलेवर गंभीर निष्काळजीपणाचे आरोप करत कठोर कारवाईची मागणी केली आहे.

मृत महिलेचे नाव शहनाज मोहम्मद जावेद अन्सारी (वय ३०) असे आहे. गायत्री नगर परिसरातील अल फलाह क्लिनिक येथे तिच्यावर उपचार सुरू होते. हे क्लिनिक डॉ. साजिया अन्सारी (इ.ण.च.ड.) चालवत असल्याची माहिती आहे. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, शहनाज अन्सारी या गर्भवती असून त्यांच्यावर याच क्लिनिकमध्ये उपचार सुरू होते. शनिवारी रात्री त्यांना प्रसूती वेदना सुरू झाल्याने क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले. मात्र प्रसूतीदरम्यान आई आणि बाळाचा मृत्यू झाल्याने नातेवाईकांनी संताप व्यक्त केला.



परिसरातील काही महिलांना या क्लिनिकमध्ये प्रसूतीसाठी आणण्याचे काम एका स्थानिक महिलेकडून केले जात असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. संबंधित महिला गर्भवती महिलांना क्लिनिकमध्ये आणणे, प्रसूतीची व्यवस्था करणे यासाठी सक्रिय असून त्याबदल्यात तिला डॉक्टरांकडून पैसे दिले जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, भिवंडी महानगरपालिका आरोग्य विभागाकडे याबाबत विचारणा केली असता, केंद्र सरकारच्या निर्देशानुसार इ.ण.च.ड. डॉक्टरांना आपत्कालीन परिस्थितीत प्रसूती करण्याची परवानगी असू शकते, मात्र त्यासाठी संबंधित क्लिनिकमध्ये आवश्यक वैद्यकीय सुविधा व साधनसामग्री असणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले. मात्र, संबंधित क्लिनिकमध्ये प्रसूतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला असून डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आई आणि बाळाचा निष्पाप बळी गेल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच या प्रकरणातील जबाबदार डॉक्टर आणि संबंधित महिलेवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# भररस्त्यातील अपमान जीवावर बेतला; परळीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात सर्वत्र आत्महत्यांच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. त्यातच आता बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे.



भररस्त्यात एका तरुणीने सर्वांसमोर कानशिलात लगावल्यामुळे झालेला अपमान सहन न झाल्याने एका सुशिक्षित तरुणाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची घटना घडली आहे. ही घटना परळी तालुक्यातील मोहा गावात घडली. चंद्रहार राजेभाऊ शिंदे असे आत्महत्या केलेल्या २४ वर्षीय तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप आणि खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रहार शिंदे हा डिझेल मेकॅनिकल डिप्लोमा झालेला अत्यंत हुशार तरुण होता. बुधवारी करेवाडी रोडवरील लाल माती परिसरात दीपाली बबन पोटभरे नावाच्या तरुणीने त्याला सर्वांसमक्ष थोबाडीत मारली होती. या जाहीर अपमानामुळे चंद्रहार प्रचंड निराश झाला होता. त्याला जबर मानसिक धक्का बसला. हा अपमान सहन न झाल्याने गुरुवारी त्याने गावातील एका लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली.

चंद्रहारच्या आत्महत्येनंतर शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर चंद्रहारच्या वडिलांनी आणि नातेवाईकांनी आपला तीव्र आक्रोश व्यक्त केला.

माझ्या मुलाने त्याच्या मनातील दुःख कोणालाच सांगितले नाही, ते त्याच्या पोटातच राहिले. त्याला झालेल्या अपमानामुळेच त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. या प्रकरणात सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी आरोपी अजूनही मोकाट आहेत. आरोपींना तात्काळ अटक करून आमच्या कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी त्याच्या पालकांनी केली आहे.

# नांदेड-पनवेल एक्सप्रेस तब्बल ९ तास उशिराने

**नांदेड । प्रतिनिधी**

रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली असून गाडी क्रमांक १७६१४ नांदेड-पनवेल एक्सप्रेस मोठ्या विलंबाने धावणार आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ही गाडी दिनांक १८ मे २०२६ रोजी नियोजित वेळेपेक्षा तब्बल ५४० मिनिटे अर्थात ९ तास उशिराने चालविण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठा फटका बसणार आहे.

नियमित वेळापत्रकानुसार नांदेड-पनवेल एक्सप्रेस ही नांदेड स्थानकातून सायंकाळी ६ वाजून २० मिनिटांनी सुटते. मात्र, आता ही गाडी १८ मे रोजी न सुटता १९ मे २०२६ रोजी पहाटे ३ वाजून २० मिनिटांनी नांदेड येथून रवाना होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने या विलंबामागचे कारणही स्पष्ट केले आहे. नांदेड-पनवेल एक्सप्रेसची लिंक गाडी असलेली गाडी क्रमांक १७६२९ हडपसर-नांदेड एक्सप्रेस ही तब्बल ४२० मिनिटे उशिराने धावत असल्याने त्याचा परिणाम नांदेड-पनवेल एक्सप्रेसच्या वेळापत्रकावर झाला आहे. लिंक गाडी उशिराने पोहोचल्यामुळे पुढील फेरीची सेवा देखील उशिराने सुरू करावी लागत आहे.

या अचानक झालेल्या विलंबामुळे प्रवाशांची गैरसोय होण्याची शक्यता असून रेल्वे प्रशासनाने त्याबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे. विशेषतः नोकरी, व्यवसाय, वैद्यकीय कामे किंवा अन्य महत्त्वाच्या कारणांसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या उशिराचा फटका बसू शकतो.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना प्रवासापूर्वी आपल्या गाडीची अद्ययावत स्थिती तपासण्याचे आवाहन केले आहे. रेल्वे चौकशी सेवा, अधिकृत संकेतस्थळ किंवा मोबाईल ॲपच्या माध्यमातून गाडीच्या वेळांची माहिती घेऊनच प्रवासाचे नियोजन करावे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# रोटरी क्लबचा मदतीचा हात: १ लाख शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटणार

**जालना । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी (पिकांना पाणी देण्यासाठी) सक्षम बनवणारा आणि ग्रामीण भागाचा कायापालट करणारा एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम रोटरीच्या ग्लोबल ग्रँट अंतर्गत जालन्यात सुरू झाला आहे. रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनतर्फे जालना जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या पोर्टेबल सोलर इरिगेशन पंप बँक या प्रकल्पाचे लोकार्पण येथील हॉटेल सॅफ्रॉनमध्ये प्रांतपाल सुधीर लातुरे यांच्याहस्ते करण्यात आले. मोफत वापरा आणि पिकांची पाणीभरणी झाल्यानंतर संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीला परत करा, या तत्त्वावरील हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आत्मनिर्भर आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल करणाऱ्या एक लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.



या प्रकल्पासाठी 'द रोटरी फाउंडेशन, अमेरिका' यांच्याकडून ३० लाख रुपयांपेक्षा अधिक निधी मिळाला आहे. तसेच या कामात ऑस्ट्रेलियाच्या रोटरी क्लब ऑफ नॉर्थ रायड'चे विशेष सहकार्य लाभले आहे.

अनियमित वीजपुरवठा आणि पावसाची अनिश्चितता यामुळे शेतीचे मोठे नुकसान होते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील ७० हून अधिक शेतकरी उत्पादक संस्थांशी जोडलेल्या एक लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना याचा थेट फायदा होणार असून त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. शेतकरी उत्पादक कंपन्यांना ७० सोलर पंप सुपूर्द करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळांने प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकरी उत्पादक कंपन्यांची पारदर्शी पद्धतीने निवड केली असून, या कंपन्यांशी संलग्न शेतकऱ्यांना निशुल्क वापरण्यासाठी हे सौरऊर्जा पंप मिळतील. सोलर पंप लोकार्पण सोहळ्यात बोलताना रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी रोटरी जालना मिडटाउनच्या सातत्यपूर्ण समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत हा क्लबचा चौथा यशस्वी ग्लोबल ग्रँट प्रकल्प असल्याचे सांगितले. माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनीही टीमचे अभिनंदन करत एनजीओ भागीदार सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ यांच्या शेतकरी जनजागृती आणि संपर्क मोहिमेतील योगदानाचा गौरव केला. प्रस्ताविकपर भाषणात रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनचे अध्यक्ष अंकित अग्रवाल म्हणाले की, हा प्रकल्प शेतकऱ्यांना विश्वासार्ह आणि शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच जलसंवर्धन आणि आधुनिक शेती पद्धतींबाबत जनजागृती करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

# जालना शहरातील संग्राम नगरमध्ये कडक उन्हाळ्यात नाल्यांचे पाणी रस्त्यावर

## स्वच्छता विभाग करतंय तरी काय? - नागरिकांचा संतप्त सवाल

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १७ रविवार रोजी सकाळी दहा वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील बस स्टँड परिसरात असलेल्या संग्राम नगर भागामध्ये महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः नरकयातना बनले आहे. मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यातच नाल्यांचे घाण पाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डास-मच्छरांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, गल्लीमध्ये नागरिकांना पाय ठेवायलाही जागा उरलेली नाही.

संग्राम नगर ते मामा चौक दरम्यानच्या परिसरात अनेक ठिकाणी नाल्यांचे पाणी रस्त्यावर साचत असून नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. घरासमोरच घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने परिसरातील रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. महानगरपालिकेचा स्वच्छता विभाग शहर स्वच्छतेच्या मोठमोठ्या घोषणा करतो, मात्र संग्राम नगरकडे ढुंकूनही पाहिले जात नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. विशेष म्हणजे, पावसाळा सुरू होण्यापूर्वीच ही परिस्थिती निर्माण झाली असून अवकाळी पाऊस जरी झाला तरी घरांमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नाल्यांच्या साफसफाईकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.





दरम्यान, संग्राम नगर बस स्टँड रोड ते मामा चौक दरम्यान असलेल्या मुख्य नाल्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. या संदर्भात परिसरातील रहिवाशांनी जालना महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन देत नाल्याचे संपूर्ण मोजमाप करून सर्व अतिक्रमणे निष्पक्षपणे हटवण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संग्राम नगर ते मामा चौक परिसरातील मुख्य नाला हा नविन जालना भागातील सांडपाणी वाहून नेणारा प्रमुख मार्ग आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून नाल्यावर बेकायदेशीर अतिक्रमणे करण्यात आल्याने नाल्याची रुंदी कमी झाली आहे. परिणामी पावसाळ्यात पाणी तुंबून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

सध्या महानगरपालिकेमार्फत शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू असली तरी काही ठिकाणी कारवाई होत असताना प्रभावशाली व्यक्तींच्या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाची कारवाई पक्षपाती पद्धतीने होत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. नागरिकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देत कोणताही राजकीय किंवा आर्थिक दबाव न मानता नाल्यांचे मोजमाप करून सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे तात्काळ हटवावीत, तसेच कायमस्वरूपी निचरा व्यवस्था उभारून संग्राम नगरवासीयांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**